शिक्षण जगत



करा़ड येथील वेणुताई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत साक्षी निगडे यांनी मार्गदर्शन केले.

# ‘वेणुताई’मध्ये सायबर जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर वॉरियर्स क्लबच्या वतीने वेणुताई इंग्लिश मीडियम स्कूल, कराड येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती सत्र आयोजित केले. यामध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव तसेच ‘माय डाटा, माय रिस्पोन्सिबिलीटी’ या संकल्पनेबाबत मार्गदर्शन केले.

सायबर वॉरियर्स क्लबचे प्रेसिडेंट अनिकेत देशमाने व क्लबच्या ॲक्टिव्हिटी डायरेक्टर साक्षी निगडे यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, डिजिटल गोपनीयता तसेच स्वतःच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

यावेळी प्राचार्या सीता माने उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडच्या सायबर वॉरियर्स क्लबच्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे, प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.